# नाशिक महानगरपालिका,नाशिक

## नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील नाटयगृह संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता कर्मचारी निवड समितीची बैठक

## गोषवारा

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | गट | एकुण मंजुर पदे | सरळ सेवेसाठी मंजुर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | पदोन्नती साठी मंजुर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | पदोन्तीस पात्र कर्मचारी | पदोन्तीची रिक्त राहणारी पदे | रिक्त राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक कालीदास कलामंदीर, व्यवस्थापक, तारांगण/ व्यवस्थापक | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | विचारक्षेत्राच्या यादीत पात्र उमेदवार नाहीत |
| २ | नाटयगृह सुपरवायझर | क | ६ | ३ | ० | ३ | ३ | ३ | ० | ० | ० | |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

**नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील नाटयगृह संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता कर्मचारी निवड समितीची बैठक**

**-: बैठकीचे इतिवृत्त :-**

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनवेरील विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देणेकामी जा.क्र.आस्था/वशि/१८६८/२०२० दिनांक ०६/०८/२०२० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५४ (१) नुसार "कर्मचारी निवड समिती" गठीत करण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील नाटयगृह संवर्गातील नाटयगृह सुपरवायझर संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्तीने भरणेकरिता दिनांक ०४/०२/२०२१ व दिनांक १२/०८/२०२१ रोजी नाशिक महानगरपालिका कर्मचारी निवड समितीच्या बैठका संपन्न झाल्या. सदर बैठकांना खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | कर्मचारी निवड समितीवरील पद |
|---|---|---|
| १) | श्री.संदिप रामचंद्र नलावडे,<br>अधिक्षक अभियंता (मलनि:स्सारण) | अध्यक्ष |
| २) | श्री.बोधीकरण जनार्दन सोनकांबळे,मुख्यलेखापरिक्षक,<br>तथा मागासवर्गीय अधिकारी | सदस्य |
| ३) | श्री.प्रदिप चौधरी, उपआयुक्त(कर) | सदस्य |
| ४) | श्री.संजय अग्रवाल,उप अभियंता (स्थापत्त) | विभागप्रमुख (मिळकत विभाग) |
| ५) | श्री.मनोज घोडेपाटील, उपआयुक्त(प्रशासन) | सदस्य सचिव |

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे पदोन्नतीने भरतांना खालीलप्रमाणे बाबी तपासण्याबाबत समिती सदस्यांमध्ये सहमती झाली व त्यानुसार खालील बाबींची पडताळणी करण्यात आली.

१) नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१४ तयार करण्यात आलेले आहेत. त्यास मा.महासभा ठराव क्रमांक १४८ दिनांक १९/०६/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे सेवाप्रवेश जा.क्र.आस्था/वशि/९९०/२०१७ दिनांक १०/०७/२०१७ अन्वये मा.शासनाकडे मंजुरीस पाठविण्यात आलेले आहेत. त्यानुसार मा.आयुक्तांचे निर्देशाप्रमाणे शासनाकडे प्रस्तावित केलेले सेवाप्रवेश नियम २०१४ प्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांचे पदोन्नती संदर्भातील अटी-शर्ती, शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी बाबी विचारात घेऊन पदोन्नती देणेबाबत कार्यवाही करण्याचे ठरले. पदोन्नतीसाठी शिफारशीकरीता जे संवर्ग/पदे यांची सेवाप्रवेश नियमातील अर्हता, फिडर केडर इत्यादी बाबत तांत्रिक बाबी उद्भवल्यास त्याबाबत मनपा आयुक्त यांची मान्यता प्राप्त करुन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात आली.

२) पदोन्नतीसाठी विचार करताना संबंधित कर्मचाऱ्यांचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल,विभागीय चौकशी, निलंबन,शास्ती,न्यायालयात दाखल गुन्हे,लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई इत्यादी अनुषंगाने पडताळणी करण्यात आली.

३) शासन निर्णय क्रमांक:वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक २ जून,२०१४ आणि नाशिक महानगरपालिका आदेश क्रमांक ६२३ दिनांक १६/६/२०१४ नुसार सर्व टप्प्यांवरील पदोन्नतीसाठी त्या-त्या वर्षाची मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही पूर्व अट म्हणून विहित करण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने दिनांक ३१ मार्च २०२० च्या स्थितीस अनुसरुन मालमत्ता व दायीत्वाची विवरणपत्रे सादर केले नसल्यास संबंधितांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात येऊ असे ठरले.

४) पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २७९७/२०१५ वर दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना शासन पत्र जा.क्र.बीबीसी-२०१७/ प्र.क्र.३१२अे/१६-ब, दिनांक २९ डिसेंबर,२०१७ अन्वये दिलेल्या होत्या. त्यानुसार, "***तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील***

| अधिक्षक अभियंता<br>(संदिप नलावडे) | मुख्यलेखापरिक्षक<br>(बोधीकरण सोनकांबळे) | उपआयुक्त(कर)<br>(प्रदिप चौधरी) | मिळकत व्यवस्थापक<br>(संजय अग्रवाल) | उपआयुक्त(प्रशासन)<br>(मनोज घोडेपाटील) |
|---|---|---|---|---|

***खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळवून सेवाजेष्ठता यादी वरच्या स्थानावर आले नाहीत,याची खात्री करावी."*** असे निर्देश शासन पत्रानुसार देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तांत्रिक / अतांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्यासाठी कर्मचारी निवड समितीचे कामकाज सुरु करण्यात आलेले होते. दरम्यान महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ अन्वये दिनांक २९/१२/२०१७ चे पत्र रद्द करण्यात आले आहे व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारित निर्देश देण्यात आले.

***"मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या याचिका क्र. २७९७/२०१५ वरील दिनांक ४/८/२०१७ निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व १००% पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात यावीत.***

***जे अधिकारी / कर्मचारी दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयापूर्वी अथवा त्यानंतर पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, त्यांच्या दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या अथवा त्यानंतरच्या ज्येष्ठता यादीनुसार त्यांचा सेवाकनिष्ठ अधिकारी अथवा कर्मचारी पदोन्नतीला ज्यावेळी पात्र होईल,त्यावेळी दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेतलेला अधिकारी किंवा कर्मचारी यांचा पदोन्नतीकरिता विचार करण्यात यावा".***

उपरोक्त निर्देशांनुसार विचार क्षेत्राच्या यादीत आवश्यक त्या सुधारणा करुन सर्व संवर्गांच्या विचार क्षेत्राच्या (Consider Zone) यादीची फेरतपासणी करुन शासन निर्देशानुसार पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने भरणेबाबत विचार करण्यात आला.

५) ही कार्यवाही प्रगतीत असतानाच शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दिनांक २० एप्रिल,२०२१ अन्वये दिनांक १८ फेब्रुवारी,२०२१ चा उक्त नमूद शासन निर्णय रद्द केला व ***"मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ याप्रकरणी दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील आरक्षित पदे रिक्त ठेऊन खुल्या प्रवर्गातून सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत"***,असे निर्देश दिले.

६) सदर निर्देशानुसार कार्यवाही सुरु असतानाच शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दिनांक ०७ मे,२०२१ अन्वये दिनांक २० एप्रिल,२०२१ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

७) उपरोक्त निर्देशानुसार आणि दरम्यानच्या काळात सेवानिवृत्त / मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन सुधारित विचार क्षेत्राच्या याद्या तयार करण्यात आल्या.

८) दरम्यान दिनांक ०५ जुलै,२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये गट-**अ** आणि गट-**ब** मधील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण देण्याबाबत निर्देश दिले. तसेच पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका (स्टॅम्प) क्रमांक ६८१९/२०२१ व इतर याचिकांमध्ये दिनांक २९ जून,२०२१ व दिनांक २२ जुलै,२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (१००%) भरण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी दिनांक २३ जुलै,२०२१ चे पत्रान्वये राज्य शासनाने निर्देश दिले.

९) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३३/नवि-२८, दिनांक १६/०४/२०२१ अन्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act,२०१६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिकेच्या आस्थापनेतील गट-अ व गट-ड संवर्गातील पदे दिव्यांगांसाठी सुनिश्चित करण्यात आली आहेत. सदरचा शासन निर्णय विचारात घेण्यात आला.

| अधिक्षक अभियंता | मुख्यलेखापरिक्षक | उपआयुक्त(कर) | मिळकत व्यवस्थापक | उपआयुक्त(प्रशासन) |
|---|---|---|---|---|
| (संदिप नलावडे) | (बोधीकरण सोनकांबळे) | (प्रदिप चौधरी) | (संजय अग्रवाल) | (मनोज घोडेपाटील) |

१०) राज्य शासनाच्या निर्देशानुसार पदोन्नतीची कार्यवाही करण्यासाठी दिनांक ३१ जुलै,२०२१ रोजीची पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदांची स्थिती निश्चित करुन, सेवानिवृत्त / मयत कर्मचाऱ्यांची नांवे विचार क्षेत्राच्या यादीतून वगळण्यात आली. तसेच पदोन्नतीमध्ये दिव्यांगाना ४% आरक्षण देण्यासाठी दिव्यांग अधिनियम २०१६, शासन निर्णय दिनांक ०५ मार्च,२००२ आणि शासन निर्णय दिनांक ०५ जुलै,२०२१ मधील तरतुदी विचारात घेऊन दिव्यांगाना पदोन्नती देण्यासाठी विचार क्षेत्राची यादी गरजेनुसार पाच पटीपर्यंत वाढवून विचार क्षेत्राच्या याद्या अद्यावत करण्यात आल्या.

११) पदोन्नत अधिकारी/कर्मचारी यांनी पदोन्नती नाकारल्यास महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३०३/कार्या-१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

१२) नाशिक महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर देण्यात येणारी पदोन्नती व तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती ही मा.उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक २७९७/२०१५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून तसेच मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका (स्टॅम्प) क्रमांक ६८१९/२०२१ व इतर याचिकांमधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे सदर नेमणुका हया निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्याने,या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीचे पदावर नियमितपणाचा व सेवाजेष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

१३) मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या परिणामस्वरुप किंवा राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांच्या परिणामस्वरुप तात्पुरत्या दिलेल्या पदोन्नत्या कायम होऊ न शकल्यास आणि पदोन्नत कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याची वेळ आल्यास First Come Last Go या पध्दतीने पदोन्नती पूर्वीच्या पदावर पदावनत करावे लागेल.

मे.न्यायालयाचे निर्णय, विविध शासन निर्णयांन्वये दिलेले निर्देश, नाशिक महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मधील तरतुदी, मा.मनपा आयुक्त सो. यांनी दिलेले निर्देश या सर्व बाबी विचारात घेऊन **दिनांक १२/०८/२०२१** रोजी अंतिम बैठक घेण्यात येऊन कर्मचारी निवड समितीने विषयवार खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत;

**विषय क्रमांक १ व्यवस्थापक,कालीदास कलामंदीर, व्यवस्थापक,तारांगण/व्यवस्थापक संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत.**

७ वा वेतनआयोगानुसार वेतनमॅट्रीक्स मधील वेतनस्तर- S-१३ : रु.३५४००-११२४००

नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१४ नुसार नियुक्तीचे प्रमाण:(पदोन्नती १०० %)

| एकुण मंजुर पदे | पदोन्नतीसाठी मंजूर पदे | पदोन्नतीने कार्यरत पदे | पदोन्नतीसाठी दि.३१/०७/२०२१ रोजी रिक्त पदे | पदोन्नतीसाठी संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | दिव्यांग आरक्षण ४%टक्के पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ० | १ | ० | १ | सदरचे पद सुनिश्चित नाही. |

१) **व्यवस्थापक,कालीदास कलामंदीर, व्यवस्थापक,तारांगण/व्यवस्थापक या पदाचे पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता व अन्य अर्हता** :- (नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१४ मधील **पृष्ठ क्रमांक १२ अ.क्र.५२**)

**नामनिर्देशन** :- मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.

**पदोन्नती** :- नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाजेष्ठता व गुणवत्ता या आधारे सहाय्यक व्यवस्थापक या संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०३ वर्षाचा अनुभव.

| अधिक्षक अभियंता (संदिप नलावडे) | मुख्यलेखापरिक्षक (बोधीकरण सोनकांबळे) | उपआयुक्त(कर) (प्रदिप चौधरी) | मिळकत व्यवस्थापक (संजय अग्रवाल) | उपआयुक्त(प्रशासन) (मनोज घोडेपाटील) |
|---|---|---|---|---|

**व्यवस्थापक,कालीदास कलामंदीर, व्यवस्थापक,तारांगण/व्यवस्थापक** या पदाचे पदोन्नतीसाठी निम्न संवर्ग (Feeder Cadre) सहाय्यक व्यवस्थापक, कालीदास कलामंदीर असा आहे.

उपरोक्तप्रमाणे शैक्षणिक अर्हता / अनुभव विचारात घेऊन **व्यवस्थापक,कालीदास कलामंदीर,व्यवस्थापक, तारांगण/व्यवस्थापक** या पदाचे पदोन्नतीसाठी सहा.व्यवस्थापक कालीदास कलामंदीर या निम्न संवर्गातून विचारक्षेत्रात (Consideration Zone) मध्ये खालीलप्रमाणे उमेदवार उपलब्ध होत आहेत.

**विचारक्षेत्रातील यादी-**

| अ.क्र. | सेवा जेष्ठता क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | शैक्षणिक पात्रता | जात व जातीचा प्रवर्ग | संवर्गात आल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. कहाणे जगन्नाथ कारभारी | एस.एस.सी पास, आय.टी. आय. रेफ्रीजरेटर ॲण्ड एसी मॅकेनिक कोर्स एन सी टी व्ही टी. | तेली इमाजा | ०६.०१.१९९७ | |

**कर्मचारी निवड समितीची शिफारस-**

उपरोक्त विचारक्षेत्राच्या यादीत श्री.कहाणे जगन्नाथ कारभारी, सहा.व्यवस्थापक या निम्न संवर्ग (Feeder Cadre) मध्ये एकमेव उमेदवार असून पदोन्नतीसाठी आवश्यक असणारी अर्हता पूर्ण करीत नाही. त्यामुळे व्यवस्थापक,कालीदास कलामंदीर, व्यवस्थापक,तारांगण/व्यवस्थापक या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवार उपलब्ध होत नाही.

**पात्र उमेदवारांची (निवड) यादी-**

| अनु क्रमांक | विचारक्षेत्राचे यादीतील अ.क्र. | जेष्ठता क्रमांक | कर्मचा-याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **निरंक** | | | |

विचारक्षेत्राचे यादीतील खालील नमूद उमेदवार हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कारणास्तव पदोन्नतीसाठी अपात्र ठरत आहेत.

**अपात्र यादी-**

| अनु क्रमांक | विचारक्षेत्राचे यादीतील अ.क्र. | जेष्ठता क्रमांक | कर्मचा-याचे नाव | अपात्रतेचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | श्री. कहाणे जगन्नाथ कारभारी | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता धारण करीत नाही |

| अधिक्षक अभियंता (संदिप नलावडे) | मुख्य लेखापरिक्षक (बोधीकरण सोनकांबळे) | उपआयुक्त(कर) (प्रदिप चौधरी) | मिळकत व्यवस्थापक (संजय अग्रवाल) | उपआयुक्त(प्रशासन) (मनोज घोडेपाटील) |
|---|---|---|---|---|

**विषय क्रमांक २** **नाटयगृह सुपरवायझर संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत**

७ वा वेतनआयोगानुसार वेतनमॅट्रीक्स मधील वेतनस्तर- S-७ : रु.२१७००-६९१००

नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१४ नुसार नियुक्तीचे प्रमाण:(पदोन्नती ५० % सरळसेवा ५०%)

| एकुण मंजुर पदे | पदोन्नतीसाठी मंजूर पदे | पदोन्नतीने कार्यरत पदे | पदोन्नतीसाठी दि.३१/०७/२०२१ रोजी रिक्त पदे | पदोन्नतीसाठी संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | दिव्यांग आरक्षण ४%टक्के पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ३ | ० | ० | ० | सदरचे पद सुनिश्चित नाही. |

१) **नाटयगृह सुपरवायझर या पदाचे पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता व अन्य अर्हता** :-(नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१४ मधील **पृष्ठ क्रमांक १३ अ.क्र.५४)**

अ) शासनमान्य आयटीआय इलेक्ट्रीकल ट्रेड उत्तीर्ण.

ब) नाटयगृह ऑपरेटर पदाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव.

नाटयगृह सुपरवायझर या पदाचे पदोन्नतीसाठी निम्न संवर्ग (Feeder Cadre) नाटयगृह ऑपरेटर असा आहे.

नाटयगृह सुपरवायझर या संवर्गात पदोन्नतीने ३ पदे कार्यरत असून पदोन्नतीसाठी पदे उपलब्ध नाही.

वरीलप्रमाणे समितीवर चर्चा होऊन शिफारशी करण्यात आल्या व कर्मचारी निवड समितीचे कामकाज संपन्न झाल्याचे अध्यक्षांच्या वतीने घोषित करण्यात आले.

अधिक्षक अभियंता (मलनि:स्सारण) (श्री.संदिप नलावडे) - (अध्यक्ष)

मुख्यलेखापरिक्षक (श्री.बोधीकरण सोनकांबळे) - (सदस्य)

उपआयुक्त(कर) (श्री.प्रदिप चौधरी) - (सदस्य)

उप अभियंता (स्थापत्त) (श्री.संजय अग्रवाल) - विभागप्रमुख (मिळकत विभाग)

उपआयुक्त(प्रशासन) (श्री.मनोज घोडेपाटील) - (सदस्य सचिव)

२६/१०/२०२१

कैलास जाधव (भा.प्र.से.)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका नाशिक